(निशाणी क्रमांक ०३ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रास वादीचा अतिरीक्त सरतपास न घेता संबंधीत कागदपत्रांना नजरचुकीने निशाणी क्रमांक देण्यात आली होती. त्यामुळे आज रोजी संबंधीत कागदपत्राला निशाणी देण्याकरीता वादी यांचा अतिरीक्त सरतपास नोंदविण्यात येत आहे. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्राला पूर्वीच निशाणी क्रमांक दिली गेल्यामुळे सदय परिस्थितीत सदर कागदपत्राला तिच निशाणी देण्यात येत आहेत, ज्यामुळे सदर कागदपत्राची ओळख करतांना संभ्रम निर्माण होणार नाही.)

**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१**

मी शपथेवर सत्यकथन करते की,
माझे नाव – शहाजी सुदाम गायकवाड,
वय:– ५३ वर्षे, धंदा:– शेती,
सध्या राहणार:– जातेगाव, ता. जामखेड, जि. अहमदनगर

**वादी यांचा अतिरीक्त सरतपास वादीचे विधिज्ञ श्री. बी. व्ही. जायभाय यांचे मार्फत शपथेवर सुरु:–**

**०१.** माझे पुराव्याचे शपथपत्रातील मजकुर मला वाचुन दाखविण्यात आला व समजावून सांगण्यात आला. तो बरोबर असल्याने मी त्यावर माझी सही केली आहे. प्रस्तुत साक्षीदाराने त्याचे पुराव्याचे शपथपत्र शपथेवर सत्यापीत केल्याने त्यास वादीचा सरतपास म्हणून स्विकारण्यात येत आहे. त्यास निशाणी क्रमांक ८३ देण्यात आलेली आहे.

**०२.** मी पस्तुत दाव्याचे कामी निशाणी क्रमांक ०३ लगत खालील कागदपत्र दाखल केली आहे:–

- गट क्रमांक ९४४, ७९१ व १०५७ येथील जमीनीचा ७/१२ उताऱ्यांच्या प्रमाणित प्रती. त्यास अनुक्रमे **निशाणी क्रमांक ०८ ते १०** देण्यात आलेली आहे.

**(वादी यांच्या सुविदय वकीलांच्या तोंडी विनंती वरुन अतिरीक्त सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.)**

श्रवणोत्तर स्वीकृती,
समक्ष,

सही/–

**(अनुश्री ब. फंड)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**जामखेड**.

दिनांक:– १७/०२/२०२६
ठिकाण:– जामखेड